# ग्रामविकास आणि 'ग्रामगीता'

डॉ. रेखा वडिखाये

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासाच्या तळमळीतून 'ग्रामगीता'या ग्रंथाचे लेखन केले आहे. हा ग्रंथ केवळ वाचण्याचा नसून जगण्याचा ग्रंथ आहे. ग्रामविकासाची ती गाथा आहे. ग्रामजीवनाशी निगडित श्रम, शिक्षण, व्यसनाधीनता, अज्ञान, दारिद्र्य इत्यादी जवळपास सर्वच विषयांना त्यांनी ग्रामगीतेत स्पर्श करून ग्रामीण माणसाला सुखी जीवनाचा जणू कानमंत्रच दिला आहे.ग्रामजीवन आणि कृषिसंस्कृतीचे अतूट नाते आहे.त्या अनुषंगाने विचार केल्यास आजचा शेतकरी आणि त्याची अवस्था याबरोबरच शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा देशापुढे असलेला गंभीर प्रश्न दृष्टीपुढे तरळतो.या शेतकऱ्याची पर्यायाने ग्रामीण माणसांची आणि खेड्यांची अवस्था बदलावी, खेडी स्वयंपूर्ण व्हावीत याकरिता वेगवेगळ्या पातळ्यांवरून शासनाचे प्रयत्न सुरू आहेत.हे जरी खरे असले तरी स्वविकासाकरिता ग्रामीण माणसाने काय केले म्हणजे त्याची वर्तमानकालीन अवस्था बदलू शकते या संबधीची जाणीव करून देण्याच्या दृष्टीनेही ग्रामगीता या ग्रंथाचे महत्व अनन्यसाधारण आहे.महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक श्री वि. स. खांडेकर राष्ट्रसंतांच्या कार्याविषयी सांगताना म्हणतात,"ग्रामगीता हा ग्रंथ देवघरात शांतपणे तेवणाऱ्या नंदादीपासारखा आहे.आपली वाणी आणि लेखणी,शक्ती आणि भक्ती,यांचे सर्व सामर्थ्य एकवटून त्यांनी सामाजिक जागृतीचे आणि प्रगतीचे प्रयत्न परोपरीने केलेले आहेत.आपल्या देशातील झोपी गेलेली खेडी जागी व्हावीत.अज्ञान,लोकभ्रम आणि सामाजिक जडत्व यामुळे त्या खेड्यतल्या जिवांना जी अवकळा आली आहे ती नाहीशी व्हावी.तिथल्या माणसांच्या मनाचे आरसे स्वच्छ पुसले जावेत,त्यात विविध सुधारणांची आणि नव्या सुखी जीवनाच्या स्वप्नांची प्रतिबिंबे पडावीत,त्यांच्या मरगळलेल्या जीवनात चैतन्य निर्माण व्हावे,त्यांच्या अंतरूकरणावर दाटलेले शेवाळे दूर होवून आतले नितळ पाणी दिसावे व ते प्रत्येकाच्या उपयोगी पडावे. सांस्कृतिक दृष्टीने भाग्यशाली असलेला हा देश शिक्षण, आरोग्य, धनधान्य इत्यादी दृष्टीने तितकाच वैभवशाली व्हावा म्हणून संत तुकडोजी महाराजांचे मन सदैव तळमळत आले आहे .त्या तळमळीतून ग्रामगीता या ग्रंथाचा जन्म झाला."घ ''गावाकडे चला" या गांधीजींच्या संदेशाची आठवण राष्ट्रसंतांची ग्रामगीता वाचताना येते.कारण अनेक खेडी मिळून जिल्हा,अनेक जिल्हे मिळून राज्य आणि अनेक राज्ये मिळून देश, मग विश्व असा हा विस्तार आहे.तेव्हा अखिल मानवजात सुखी व्हायची असेल तर त्यासाठी ग्रामीण माणूस प्रथम सुखी झाला पाहिजे.तो प्रयत्न भारतात होऊन भारत सुखी झाला की साऱ्या जगाचे लक्ष भारताकडे वळेल आणि तो आदर्श इतर देश गिरवतील. अशा व्यापक विचारातून राष्ट्रसंतानी ग्रामगीतेची निर्मिती केली.आपल्या कर्मापासून पराङ्मुख झालेल्या माणसाला त्याचा कर्ममार्ग सांगणारा हा ग्रंथ आहे.. भगवद्गीता हा ग्रंथ ज्याप्रमाणे कर्मयोगाचे प्रतिपादन करतो त्याचप्रमाणे राष्ट्रसंताचा ग्रामगीता हा ग्रंथही ग्रामीण जनतेला कर्मयोग सांगताना दिसतो.

भूदानयज्ञ प्रवर्तक संत विनोबा भावे संत तुकडोजी महाराजांच्या कार्याविषयी सांगताना म्हणतात, "श्रीतुकडोजी महाराज आज कित्येक वर्षे अखंड जनसेवेत राबत आहेत.ग्रामीण जनतेची सेवा हा एकच ध्यास त्यांनी धरला आहे.ग्रामरचनेच्या कोणत्याच अंगाकडे त्यांचे सहसा दुर्लक्ष झाले नाही.शेवटी सारे ग्रामनिर्माण कार्य भूदानयज्ञमूलक होण्याचे अगत्य लक्षात घेऊन त्यांनी

सी. पी. अँड बेरार महाविद्यालय, नागपूर
Email : rekhawadikhaye@gmail.com

भूदानात उडी घेतली.त्यांच्या अंतरातील तळमळ त्यांच्या दरेक उद्‌गारात आणि हालचालीत दिसून पडल्याशिवाय राहत नाही."ह्र महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर म्हणतात, "महाराजांच्या जीवनाची बैठक रामदासस्वामी,विनोबा भावे,स्वामी विवेकानंद इत्यादी साधुपुरुषांसारखी आहे.हे सर्व संत भारतीय पद्धतीनेच परमार्थाचा विचार करतात.परमेश्वराच्या ठिकाणी त्यांची पूर्ण श्रद्धा आहेयपण त्यांचा ईश्वर हिमालयाच्या गिरीगव्हारात दडून बसलेला नाही.अर्धपोटी राहणाऱ्या आणि अद्यान दारिद्रिय व आळस यांच्या पाशात सापडून अगतिक झालेल्या आपल्या अगणित दीन आणि दलित देशबांधवात या संताना त्यांचा देव दिसतो."ि वरील विचारवंतांच्या विचारातून राष्ट्रसंतांच्या कार्याची कल्पना येते.ग्रामीण माणसाचा विकास हा त्यांचा ध्यास होता. कारण गावाचा विकास म्हणजे पर्यायाने देशाचा विकास होय या जाणिवेने त्यांनी ग्रामीण माणसाला उपदेश करण्यासाठी ग्रामगीतेची निर्मिती केली.ग्रामीण माणसाला श्रमाचे महत्त्व पटवून देताना ते म्हणतात,

कर्ममय विश्व आहे / कोण रिकामा बसला राहे ?
प्रत्येकजण करितचि जय / काहीतरी कर्म
परी त्या कर्माचे अनेक प्रकार ध्काही शुद्ध, निषिद्ध, मिश्र
काही विधियुक्त,काही पवित्र / निष्काम कर्म
काही कर्मे स्वतः करिता / काही कुटुंबाचिया हिता
काही कर्मे गाव लोकांकरिता / सेवाधर्मरूप ४

रोजची स्वतःची अथवा कुटुंबाची नित्यकर्मे करणे म्हणजे पुण्यपरिश्रम नव्हे. ही कर्मे तर पशुपक्षीही करतात. दुसऱ्यांसाठी केलेले माणुसकीचे कर्म, उरल्या वेळी केलेले सेवाकर्म, ईश्वरार्पण बुद्धीने जगासाठी केलेले श्रम म्हणजे धर्म होय. समाजाभिमुख होऊन समाजाच्या हिताकरिता झटणे आणि जनताजनार्दनाची सेवा करणे, त्यासाठी श्रम करणे हेच तत्त्व गीतेतही सांगितले आहे. ही बाब पटवून देताना ते म्हणतात,

जनतारूप जनार्दनाची / ज्यात सेवा न होय साची
त्यास गीताप्रिय कर्माची / पदवी आम्ही न देवू
आज भरपूर उत्पादन / हेची जनसेवेचे साधन
त्यासाठी झटेल जो जो जन / गीता कळली तयासी
श्रमिकांस जेणे लाभेल अन्न / ते कर्म श्रेष्ठ यज्ञाहून
एरवी गीतेचे ज्ञान सांगून / भलते समर्थन करू नये ५

सर्वांच्या अन्न,वस्त्र,निवारा या गरजा पूर्ण होऊन अखिल मानवजात सुखी व्हावी. हा त्यांचा व्यापक दृष्टिकोन वरील ओळींमधून स्पष्ट होतो.

राष्ट्रसंताच्या या ग्रंथाविषयी आणि त्याच्या जन्माविषयी प्रो. सोनोपंत दांडेकर लिहितात,"लोकमान्य टिळक,डॉ.ॲनी बेझंट,महात्मा गांधी या सर्व राष्ट्रीय पुढा—यांनी स्वातंर्त्याच्या चळवळीच्या वेळी एक गोष्ट लोकांच्या नजरेसमोर पुन्हा पुन्हा ठेवली व ती म्हणजे भारताची सुधारणा.म्हणजे मुंबई,पुणे यासारख्या शहराची सुधारणा नव्हे,तर भारतातील सुमारे सात लाख खेड्यांची सुधारणा.जोपर्यंत खेडी सुधारली नाहीत तोपर्यंत भारत सुधारला असे म्हणता येणार नाही व स्वातंर्त्य मिळाले असे म्हणता येणार व स्वातंर्त्य मिळाल्यानंतरही ही गोष्ट आजही मान्य केली जात आहे.राष्ट्राच्या उन्नतीसाठी प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व्हायला हवे.खेडे हे स्वयंपूर्ण स्वतंत्र घटक म्हणूनच भारतात असायला हवे,तरच भारत प्रगत राष्ट्रात मान्यता पावेल.या तत्वज्ञानाने प्रेरित होऊन श्रीसंत तुकडोजी महाराजांनी खेड्यपाड्यतून हिंडून ती सुधारण्याचा प्रयत्न सतत चालविला आहे.हा प्रयत्न करीत असता त्यांना जो अनुभव आला ,जी उणीव मार्गदर्शनाची भासली ती म्हणजे खेडोपाडी हिंडून आल्यावर त्यांना कायम स्वरूपाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे हीच. "६ खेडी सुधारा असे नुसतेच सांगून चालत नाही तर त्याकरिता काय करायला हवे,सुधारणा कसली आणि कशी करायची वगैरे प्रश्नांच्या संबंधाने मार्गदर्शन करणारा ग्रंथ म्हणजे राष्ट्रसंताची ग्रामगीता होय. हा ग्रंथ आठ भागात विभागला असून सद् धर्ममंथन पंचक,

लोकवशीकरण पंचक, ग्रामनिर्माण पंचक, दृष्टिपरिवर्तन पंचक, संस्कारशोधन पंचक, प्रेमधर्मस्थापन पंचक, देवत्व—साधन पंचक, आदर्श दृजीवन पंचक असे भाग ते आठ भाग असून प्रत्येक भागात पाच प्रकरणं आहेत.फक्त आठव्या विभागात सहा प्रकरणं आहेत. एकूण ४१ अध्याय असलेल्या या ग्रंथात मुलाच्या जन्मापासून तर अंत काळापर्यंत त्याच्या आयुष्याशी निगडित सर्वच विषयांना महाराजांनी स्पर्श केल्याचे दिसते. म्हणूनच हा ग्रंथ ” देवळात हरिविजय,भक्तिविजय वगैरे ग्रंथ जसे वाचले जातात तसा हा ग्रंथही वाचला जावा.“७ असे प्रो. सोनोपंत दान्डेकरांना वाटते. ते खरेच आहे.

महानुभाव साहित्याचे प्रमुख संशोधक प्रा. वि. भि. कोलते या ग्रंथाच्या संबंधाने बोलताना म्हणतात,” नवभारताच्या निर्मितीत ग्रामसुधारणेचे महत्व ओळखून त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या राष्ट्रपुरुषांत महाराजांचे स्थान फार वरचे आहे.या कार्याची सम्यक दिशा या गीतेत त्यांनी दाखवलेली आहे. सुप्रसिद्ध भगवद्‌गीतेप्रमाणेच या ग्रामगीतेत अध्यात्म आणि व्यवहार यांचे सुंदर मीलन झालेले आहे. या दृष्टीने पाहता या ग्रंथाला ग्रामगीता हे नाव देण्यात महाराजांनी मोठेच औचित्य दाखवलेले आहे. भगवद्‌गगी तेप्रमाणेच या ग्रंथाचे घरोघरी नित्य पठन झाले पाहिजे.तसे झाले तर ग्रामीणांच्या सुधारणेला निश्चित योग्य वळण लागेल.“* स्वतरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज एकेचाळीसाव्या अध्यायात ग्रामीण जनतेला मार्गदर्शन करताना म्हणतात,

ग्रामगीता दुरूखासि नाशवी,ग्रामगीता मृत्युसी हसवी
ग्रामगीता सहकारी तत्व वाढवी,मानवधर्म फुलवाया
चाळीस दिवस म्हणजे मंडळ ,ऐसी अनुष्ठाने प्रांजळ
करिता गाव सुधारेल सकल,संस्कारे ग्रामगीतेच्या
म्हणोनी चातुर्मास्यदि निमित्ता,मंदिरी,पारी बैठकीत बसता
वाचावी हर्षभरे ग्रामगीता, रंग रंगणी आणोनिया ९

ग्रामजीवनातील दुरूख दूर करण्याचे सामर्थ्य ग्रामगीतेत आहे याची जाणीव ग्रामगीता वाचताना प्रकर्षाने होते.खेड्यतील दुरूखाचे मूळ कारण त्यांचे अज्ञान आणि त्यातून निर्माण होणारे दारिद्यं होय. याअनुषंगाने जर त्यांना मार्गदर्शन मिळाले तर ग्रामजीवनातील दुरूख दूर होऊ शकते असा त्यांना विश्वास वाटतो. या ग्रंथात ग्रामआरोग्य, गोवंशसुधार, वेष—वैभव, गरिबीदृश्रीमंती, श्रम—संपत्ती, जीवन—शिक्षण, महिलोन्नती, सणोत्सव, यात्रा—मेळे, देव—देवळे, प्रारब्धवाद, प्रयत्न दृप्रभाव, जीवन—कला, आत्मानुभव, वैवाहिक जीवन इत्यादी महत्वाच्या विषयांवर राष्ट्रसंतानी परखड भाष्य केले आहे. सध्या, सोप्या, सुलभ म्हणजे ग्रामीणांना समजेल अशा भाषेचा वापर करून, लोकरूढी, लोकंप्रथा, लोकपरंपरा, लोकमानस इत्यादींची त्यांना रुचेल अशा भाषेत चिकित्सा केली आहे.उदा.कोणतीही गोष्ट विचाराने करावी हा विचार पटवून देताना भक्ती कशी करावी यासंदर्भात ते म्हणतात,

रात्रभरि केले भजन,पडला खाटली बिमार होऊन
मग कोठले नामस्मरण ? अरे बापा ओरडतो
अभ्यासावाचून उपास केला,दोन दिवसा पित्त, वात उमळला
मग सहा महिने खातची गेला,दवापाणी,मोसंबी
असे कासयासी करावे?,तारतम्य सोडूनी द्यावे
मग तो भोग भोगत रहावे ,आयुष्यभरी ? १०

वरील ओळीतून ते सांगतात की देवभक्तीच नव्हे तर कोणतीही गोष्ट करीत असताना तारतम्य ठेवायला हवे.नाहीतर रात्रभर भजन करून आजारी पडायचे,प्रकृतीचा विचार न करता उपासतापास करून पित्त,वात उमळला की दवापाणी करत आजारपणात सहा महिने घालवायचे. प्रकृतीची नासाडी करायची.तशीच पैशाचीही नासाडी होईल आणि सहा महिने त्याचा व्यवसाय बंद राहील अशाने त्याचा उद्धार कसा होईल ?मग हा भोग त्याला आयुष्यभर भोगावा लागेल. त्याच्या अशा अविचारी वागण्यानेही ग्रामीण माणसाच्या वाट्यला दुरूख येते असे राष्ट्रसंताना वाटते.त्यामुळे त्यांचे अज्ञान दूर करून चांगल्या वाईटाची जाणीव करून देणे हे कार्य राष्ट्रसंतांचे विचार

आणि ग्रामगीता करू शकते.गावात साधारणपणे काय चालते हे सांगताना ते म्हणतात,

कोणी दंढारी तमाशे करी ,कोणी दारू पिऊन शिव्या उच्चारी

कोणी कोणा न माने तिळभरी,लहान थोर स्वैर झाले

व्यभिचाऱ्यांची झाली दाटी ,गंजिफा खेळती पैशासाठी

मुळे करिती चोरी चपाटी,काढती भट्टी घरोघरी

मास खाण्याचे वाढले व्यसन ,चौन न पडे मद्यावाचून

अनेक रोग मास मद्यातून वाढले गावी.११

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा आजचा देशापुढील गंभीर प्रश्न आहे. त्याची कारणे फार मोठ्य प्रमाणात अस्मानी—सुल्तानी अशा प्रकारची आहेतच पण त्याचबरोबर संत तुकडोजी महाराजांनी सांगितलेली कारणेही त्यांच्या दुरूखाला, दारिद्र्याला मोठ्य प्रमाणात कारणीभूत आहेत याची जाणीव ग्रामगीता वाचताना होते. राष्ट्रसंतानी खेडोपाडी हिंडून निरीक्षण केले. खंजिरी भजने,सामुहिक भजने,सामुहिक प्रार्थना इत्यादींचे महत्व पटवून देत,त्या माध्यमातून ग्रामीण माणसाला एकत्र करून त्यांच्या उद्धाराकरिता प्रबोधन केले आणि निरीक्षणातून त्यांना जे जाणवले,जे दिसले त्यासंबंधाने त्यांचे अज्ञान दूर करण्याच्या हेतूने ग्रामगीतेत कधी परखड तर कधी सौम्य शब्दात विवेचन केले.म्हणूनच ग्रामगीता ही ग्रामीण माणसासाठी संजीवनी आहे. तिच्या संजीवक शब्दात त्याला जीवन जगण्याचे बळ देण्याचे सामर्थ्य आहे. व्यसनाधीनता, आळस, व्यभिचार, मांसाहार, जुगार या गोष्टीही शेतकऱ्यांच्या दुरूखाला कशा कारणीभूत आहेत हे ते वरील ओळीतून पटवून देताना दिसतात.

अशा ग्रामजीवनाशी निगडित असंख्य विषयांना राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत हात घालून काही ठिकाणी ग्रामीण माणसांच्या वर्मावर बोट ठेवण्याचाही प्रयत्न केला आहे. म्हणूनच हा ग्रंथ ग्रामीणांना दाखवायचा आरसा आहे.त्यात त्यांना त्यांचे प्रतिबिंब दिसणार आहे. त्यामुळे त्यांनी या ग्रंथाचे पारायण करून वाचन,मनन,चिंतन करून त्याप्रमाणे आचरण केल्यास त्यांच्या आजच्या परिस्थितीत बदल होऊ शकतो.एकंदरीत ग्रामगीता या ग्रंथाने मराठी साहित्याच्या प्रवाहात मोलाची भर घातली असून,राष्ट्रहिताच्या व मानव कल्याणाच्या दृष्टीने या ग्रंथाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

आधार ग्रंथ

ग्रामगीता दृ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, राजगुरू माधव (संकलनध्संपादन), महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ गोरेगाव मुंबई, पुनर्मुद्रण २०००

संदर्भ सूची

१. ग्रामगीता दृ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, राजगुरू माधव (संकलनध्संपादन), महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ गोरेगाव मुंबई, पुनर्मुद्रण २००० —— श्री वि.स.खांडेकर यांची पुष्पांजली

२. तत्रैव —पृ.क्र.नाही

३. तत्रैव — पुष्पांजली, पृ.क्र.नाही

४. तत्रैव —पृ.घ१९२

५. तत्रैव दृ पृ. १९३

६. तत्रैव ——— उपोद् घात दृपृ.क्र. नाही

७. तत्रैव ——— उपोद् घात दृपृ.क्र. नाही

८. तत्रैव ——— गीता—गौरव दृपृ.क्र. नाही

९. तत्रैव दृपृ. ४३५

१०. तत्रैव दृपृ. ३२३

११. तत्रैव दृपृ. ६६